# दक्षिण आशियाई देशातील लोकशाही पुढील आव्हाने

**मोसिम राजअहमद पठाण** संशोधक विद्यार्थी राज्यशास्त्र अधिविभाग शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर.

---

**प्रस्तावना** :

लोकशाही व्यवस्था प्राचीन काळापासून विकसित होत आली आहे.तत्कालीन सामाजिक –राजकीय परिस्थितीतून लोकशाही व्यवस्थेच्या संरचनेचा व लोकशाही मुल्यांचा उदय व विकास झाला. आद्य राजकीय तत्त्ववेत्ता सोक्रेटीस च्या विचारातून पाश्चिमात्य लोकशाही ची मुल्ये मांडली गेल्याचे आपल्याला दिसते. त्यानंतर प्लेटो, अरीस्टोटल यांच्या राजकीय चिंतनामध्ये लोकशाही राजकीय व्यवस्थेला प्राधान्य जरी दिले गेले नसले तरी त्याची गांभीर्याने चर्चा केली आहे . त्याचप्रमाणे पौर्वात्य देशांमध्ये लोकशाही व्यवस्था प्राचीन काळापासून विकसित होत आल्याचे दिसते. विशेषतः भारतात हडप्पा संस्कृती, वैदिक काळ, महाजनपदांच्या काळात निरंतर लोकशाही व्यवस्था विकसित झाल्याचे दिसते.

लोकशाही हे लोकसंमतीने चालणारे शासन आहे. आधुनिक काळात ही संमती सार्वत्रिक व प्रौढ मतदान हक्कानुसार होणाऱ्या निवडणूकीच्या मार्गाने होते. मतदानाचा विस्तृत होत गेलेला हक्क लोकशाहीचा पाया विस्तृत करत असतो. छोट्या ग्रीक नगरराज्यात प्रचलीत असलेली प्रत्यक्ष लोकशाही हे लोकसहभागाचे प्रत्यक्षीकरण होते. आजच्या काळातील लोकशाहीमध्ये लोकांचा सहभाग स्थिर व व्यापक राहण्यासाठी समाजपातळीवर मुल्यांबाबत सहमती, सामाजिक व्यवहाराबाबत, नियमांबाबत सहमती आणि विविध सामाजिक निर्णयाबाबत सहमती यांची आवश्यकता असते.बहूमताने अल्पमताचे म्हणने ऐकून घेण्याची आणि त्यांतील योग्य मताचे सहमतीमध्ये रूपांतर करण्याची तयारी आणि सहमती आवश्यक असेल तर मतविरोधाची सर्व मान्य पध्दती यावर लोकशाहीचे यश अवलंबून असते. बहुमतांचे शासन आणि अल्पमतांचे हक्क यांत समतोल साधणे यामुळे लोकशाही गतिमान राहते. राजकीय दृष्टीने संमती, सहमती व सहकार्य यावर लोकशाही शासनाचा भर असला तरी शासन चालविण्यापेक्षा त्यांच्या दिशेला लोकानुवर्ती व प्रातिनिधिक वळण देणे त्यामागे अभिप्रेत आहे. समाज जीवनातील विशिष्ट मुल्ये आणि आचरण पद्धती जाणीवपूर्वक जपण्याचा आग्रह लोकशाही व्यवस्थेत धरला जातो.

पाश्चिमात्य देशातील लोकशाही व पौर्वात्य देशातील लोकशाही राजकीय व्यवस्थे मध्ये सातत्याने काही मुलभूत वेगळेपण असल्याचे मत विविध विचारवंतानी व्यक्त केले आहेत. पौर्वात्य देशांपैकी विशेषतः आशियाई देशांमध्ये लोकशाही व्यवस्था स्वतंत्रपणे विकसित झाली असे म्हणता येईल. आशियाई देशांमध्ये लोकशाही मुल्ये जरी प्राचीन काळापासून अस्तित्वात होते तरी आधुनिक लोकशाही व्यवस्था अगदी अलीकडच्या म्हणजे वसाहतोत्तर काळामध्ये जन्माला आली आहे. आशियाई राष्ट्रांपैकी दक्षिण आशियामधील भारत,पाकिस्तान,बांग्लादेश,श्रीलंका,अफगाणिस्तान,भूतान,नेपाळ व मालदीव या राष्ट्रांपैकी बहुतेक राष्ट्रावर प्रत्यक्ष–अप्रत्यक्षपणे प्रामुख्याने इंग्रजांचे राज्य वसाहत काळामध्ये राहिलेले आहे. इंग्रजांचे राज्य स्वातंत्र्य चळवळीच्या माध्यमातून बदलवल्यानंतर या देशामध्ये आधुनिक लोकशाहीची मुहूर्तमेढ रोवली गेली. प्रत्येक राष्ट्राने आपल्या सामाजिक , सांस्कृतिक व राजकीय गरजेप्रमाणे लोकशाही व्यवस्थेचा स्वीकार केला. त्याचे स्वरूप, संरचना ही तत्कालीन परिस्थितीनुसार स्वीकारण्यात आली.परंतु दक्षिण आशियाई देशातील लोकशाही व्यवस्थे पुढे काही आव्हाने कालांतराने उभी राहिली.परंतु या आव्हानांपैकी काही आव्हाने हे लोकशाही व्यवस्थेच्या अंगभूत लक्षणामुळे तयार झाली आहेत तर काही आव्हाने ही तत्कालीन सामाजिक-राजकीय परिस्थितीतून तयार झाली आहेत. त्याची चर्चा पुढे सविस्तर केली आहे.

**दक्षिण आशियाई देश :**

भौगोलिक दृष्ट्या सलगता असणारा दक्षिण आशिया हा प्रदेश आशिया खंडातील सर्वाधिक लोकसंख्या असणारा भूभाग आहे. प्रामुख्याने आठ देश दक्षिण आशियाई देश म्हणून ओळखले जातात.त्यामध्ये भारत,पाकिस्तान,बांग्लादेश,श्रीलंका,अफगाणिस्तान,भूतान,नेपाळ व मालदीव या देशांचा समावेश आहे. या आठ देशांपैकी अफगाणिस्तान व भूटान वगळता सर्व देशामध्ये पूर्णपणे लोकशाही राज्यव्यवस्था कार्यरत आहे. दक्षिण आशियाई प्रदेशातील लोकांचे प्राचीन काळापासून एकमेकांशी आर्थिक, धार्मिक ,सांस्कृतिक सबंध असल्याचे आपल्याला दिसतात. हा संपूर्ण प्रदेश राजकीयदृष्ट्या परस्परसंबंधातून आकाराला आल्याचे आपल्याला म्हणता येईल. या प्रदेशातील संस्कृती,भूगोल,अर्थकारण व राजकारण या सर्व बाबींमध्ये बरेचसे सामायिक घटक आढळून येतात. त्यामध्ये हवामान, धार्मिक परंपरा, अर्थव्यवस्थेचे प्रारूप व राजकीय व्यवस्था यांचा समावेश करता येईल. या देशांना वासाहातिक पारतंत्र्याचा सामायिक वारसा असल्यामुळे, हा वारसा या प्रदेशात आधुनिक लोकशाही व्यवस्था स्वीकारण्यास कारणीभूत ठरला असल्याचे मत राजकीय अभ्यासकांनी व्यक्त केले आहे. प्रस्तुत शोधनिबंधात आपण दक्षिण आशियाई देशातील लोकशाही पुढील आव्हानांचा आढावा घेणार आहोत.

**दक्षिण आशियाई देशांतील लोकशाहीची वैशिष्ट्ये:**

दक्षिण आशिया मधील आठ देश हे प्रामुख्याने ब्रिटीश राजवटीपासून स्वतंत्र झालेले देश आहेत.अफगाणिस्तान वगळता सर्व देशांमध्ये ब्रिटीश राजवटीचा प्रभाव प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष रित्या राहिलेला आहे. ब्रिटीश राजवटीपासून स्वातंत्र्य मिळाल्यानंतर प्रत्येक देशाने आपली स्वतंत्र राजकीय व्यवस्था स्वीकारली आहे. त्यामध्ये प्रामुख्याने लोकशाही राजकीय व्यवस्थेचा स्वीकार केला. त्याला अपवाद म्हणून अफगाणिस्तान, भूटान व नेपाळ या देशांमध्ये सुरुवातीला लोकशाही व्यवस्था स्वीकारली नव्हती परंतु कालांतराने नेपाळ मध्ये लोकशाही व्यवस्था कार्यरत झाली आहे आणि भूटान मध्ये लोकशाही मुल्यांचा स्वीकार करून संविधानात्मक राजेशाही स्वीकारण्यात आली.अफगाणिस्तान मध्ये सध्या तालिबान सारख्या मुलतत्ववादी संघटनेचा ताबा आहे व तेथील राजकीय व्यवस्था सध्या इस्लामी कायदा म्हणजे 'शरीयत' प्रमाणे राबवली जात आहे. परंतु इतर देशामध्ये लोकशाही व्यवस्था स्वीकारलेली असून येथील लोकशाही व्यवस्थेची ठळक वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे सांगता येतील :

**१) वैविध्यता**
**२) समुदायवाद**
**३) बहुसांस्कृतता**
**४) राज्याचे वर्चस्व**
**५) सांस्कृतिक प्रभाव**

**वैविध्यता :**

दक्षिण आशिया हा प्रदेश वैविध्यतापूर्ण प्रदेश आहे. दक्षिण आशियाई देशांमध्ये धार्मिक,जातीय, सांस्कृतिक, पर्यावरणीय व राजकीय वैविध्यता आढळते. दक्षिण आशिया मध्ये प्रामुख्याने हिंदू,ख्रिश्चन,बौद्ध, इस्लाम,जैन,ज्यू,शीख इ.धर्माचे लोक राहतात. त्याचबरोबर लोकांच्या सांस्कृतिक प्रथा – परंपरा या वेगवेगळ्या असल्याचे दिसतात.या प्रदेशात अनेक भाषा बोलल्या जातात.भाषेची वैविध्यता या प्रदेशातील लोकांचा लोकशाहीतील राजकीय सहभाग वाढविण्यास मदत करते.या विविधांगी वैविध्यतेतून दक्षिण आशियाई देशाची आधुनिक लोकशाहीची राजकीय व्यवस्था आकाराला आली आहे.

**समुदायवाद**

समुदाय वाद म्हणजे व्यक्ती च्या अधिकारांपेक्ष्य समुदायाच्या अधिकारांना प्राधान्य देणे होय. दक्षिण आशियाई समाजरचनेमध्ये समुदायवादाला अतिशय महत्व आहे. येथील सामजिक रचना व्यक्ती पेक्षा समुदायाला प्राधान्य देणारी आहे. दक्षिण आशिया मधील व्यक्तीची ओळख हि प्रामुख्याने त्याच्या समाजाशी जोडलेली आहे म्हणजेच व्यक्तीच्या स्वतंत्र अस्तित्वापेक्ष्या त्याची सामुहिक ओळख जास्त

महत्वाची ठरते. धर्म,पंथ,वंश,जात,राजकीय समाज इत्यादी सामुदायिक घटकाना महत्व आहे. समुदायवादामुळे दक्षिण आशियाई देशातील लोकशाही मध्ये समुदायांच्या अधिकारांनाही महत्व प्राप्त झाले .व्यक्तीचे सामुदायिक अधिकार हे व्यक्तीच्या संपूर्ण विकासासाठी आवश्यक असतात अशी पारंपारिक मान्यता दक्षिण आशियाई देशांच्या सांस्कृतिक गृहीतकांमध्ये असल्याचे दिसते.

**बहुसांस्कृतता**

दक्षिण आशिया समाज हा बहुसांस्कृतिक समाज आहे. दक्षिण आशियाई देशांमध्ये विविध धर्माचे, पंथाचे, जातीचे, वंशाचे,विविध परंपरा मानणारे लोक राहतात. त्याचबरोबर अनेक भाषा व बोलीभाषा बोलणारे विविध समूह या प्रदेशात वास्तव्य करतात. दक्षिण आशियाई देशातील लोकशाही व्यवस्थेमध्ये व्यक्तींच्या सांस्कृतिक अधिकारांना महत्वाचे स्थान देण्यात आल्याचे आपल्याले दिसते. प्रत्येक देशातील अल्संख्यांक नागरिकांना तेथील स्थानी राजकीय प्रक्रियेमध्ये सामील करून घेण्याचे प्रयत्न येथील लोकशाही च्या प्रारूपामध्ये झाल्याचे आपल्याला दिसते. व्यक्तीचे व समुदायाचे सांस्कृतिक अधिकार घटनात्मक तरतुदींच्या माध्यमातून संरक्षित करण्याचे प्रयत्न केले गेले आहेत. थोडक्यात लोकशाही मध्ये अपेक्षित असलेले व्यक्तीमूल्य बहुसांस्कृतीकतेचा स्वीकार करून येथील लोकशाही व्यवस्थेमध्ये त्याची जपणूक केल्याचे दिसते तसेच सर्व सांस्कृतिक घटकांना राजकीय प्रक्रियेत स्थान देण्याचा प्रयत्न झाल्याचे आपल्याला दिसते.

**राज्याचे वर्चस्व**

दक्षिण आशियाई देशातील लोकशाही राजकीय व्यवस्थेचे अतिशय महत्वाचे वैशिष्ट्य म्हणजे राज्यसंस्थेचे वर्चस्व हे आहे. सामान्यतः संपूर्ण आशियाई देशामध्ये राज्यसंस्थेचे वर्चस्व जाणवते. सार्वजनिक क्षेत्र असो कि व्यक्तिगत क्षेत्र, त्यासबंधी राज्याच्या भूमिकेला अतिशय महत्व असल्याचे दिसते . राज्य व्यक्तीच्या आयुष्याचे सर्वांगानी व्यवस्थापन व नियंत्रण करणारी संस्था असल्याचे ठळकपणे जाणवते. समाजाच्या धार्मिक, सांस्कृतिक,आर्थिक व व्यक्तिगत अशा सर्व क्षेत्रामध्ये राज्याचे हस्तक्षेप असल्याचे दिसून येते.

**सांस्कृतिक प्रभाव**

दक्षिण आशियाई लोकशाही व्यवस्था मूलतः येथील सांस्कृतिक प्रभावातून आकाराला आली आहे. लोकशाहीच्या पाश्चिमात्य प्रारूपाची पुनर्मांडणी इथल्या सांस्कृतिक प्रभावातून दक्षिण आशिया मध्ये झाल्याचे दिसते.लोकशाही राजकीय व्यवस्था ही स्थानिक सांस्कृतिक मूल्यांनी कमी अधिक प्रमाणात प्रभावित होत असते परंतु दक्षिण आशियाई देशामधील लोकशाही व्यवस्था हि मोठ्या प्रमाणात सांस्कृतिक घटकांच्या प्रभावात आकाराला आल्याचे दिसते. उदाहरणात दक्षिण आशियाई देशातील बहुसंख्यांक लोकांच्या धार्मिक-सांस्कृतिक परंपरा यांचा प्रभाव लोकशाही संस्थांवर दिसून येतो.

वरीलप्रमाणे दक्षिण आशियाई देशातील लोकशाहीची काही ठळक वैशिष्ट्ये आहेत.येथील ओक्षाही ही विविध प्रभावातून आकारला आलेली संमिश्र लोकशाही व्यवस्था असल्याचे दिसते.

**दक्षिण आशियाई देशांतील लोकशाही पुढील आव्हाने :**

**बहुसंख्यांकवाद**

बहुसंख्यांकवाद म्हणजे देशातील बहुसंख्यांक असणाऱ्या लोकांच्या मताचे प्रभाव देशाच्या राजकीय प्रक्रियेवर असणे होय. बहुसंख्याकवाद दक्षिण आशियाई लोकशाही समोरील एक सार्वजनिक आव्हान आहे. लोकशाही मध्ये 'बहुमताचे राज्य' या तत्वाला महत्व असल्यामुळे याच तत्वाचा आधार घेत बहुसंख्यांकवाद एक आव्हान बनून उभे राहिले आहे. बहुसंख्यांकवादामुळे भाषा,संस्कृती,धर्म अशा

विविधांगाने बहुजिनसी असणारा दक्षिण आशियाई समाज येथील अल्संख्यांक समुदायाला त्यांच्या हक्कांचे संरक्षण करण्याची खात्री देऊ शकत नाही व सत्तेमध्ये न्याय वाटा मिळण्याची अपेक्षा येथील लोकशाही व्यवस्थेमधून पूर्ण होईल याची त्यांना खात्री वाटत नाही. त्यामुळे बहुसंख्यांक विरुद्ध अल्संख्यांक अशी परीस्थित निर्माण झाल्याचे दिसते.

**लोकशाही संस्थांची विश्वासार्हता**

लोकशाही मध्ये लोकशाही संस्थांची उभारणी आणि त्यांची स्वायत्तता अतिशय महत्वाची असते. लोकशाही संस्थांमध्येसंसास्द कायदेमंडळ, न्यायालय, निवडणूक आयोग, लष्करी यंत्रणा, प्रशासकिय संस्था अशा विविध संस्थांचा समावेश होतो.लोकशाही चे भवितव्य हे या संस्थामुळे अबाधित राहत असते.लोकशाही व्यवस्थेला दृढ आणि बळकटी देण्याचे काम या लोकशाही संस्थांच्या माध्यमातून होत असते.दक्षिण आशियाई देशातील लोकशाही संस्थाची विश्वासार्हता एक चिंतेचा विषय बनल्याचे दिसत आहे. लोकशाही संस्थांनी कोणत्याही प्रभावापासून मुक्त राहून स्वतंत्र आपले कर्तव्य बजावणे आपेक्षित असते परंतु दक्षिण आशियाई देशातील प्रमुख लोकशाही संस्था या स्वायत्त पाने काम न करता विविध दबावाखाली काम करत असल्याचे दिसते. या संस्थाच्या अकार्यक्षमतेमुळे यांची लोकांमधील विश्वासार्हता टिकून राहिले नास्लायचे दिसते. निवडणूकांमध्ये होणारा हस्तक्षेप, न्यायदान प्रक्रियेत टाकला जाणारा दबाव, प्रशाकीय यंत्रणा मधील पक्षपातीपणा यामुळे लोकशाही संस्थांची विश्वासार्हतेला आव्हान निर्माण झाले आहे. अशा लोकशाही संस्थांची डळमळीत झालेली विश्वासार्हता दक्षिण आशियाई लोकशाही समोरील महत्वाचे आव्हान असल्याचे दिसते.

**वांशिक संघर्ष**

दक्षिण आशियाई देशामध्ये वांशिक संघर्षाचे मोठे आव्हान येथील लोकशाही समोर असल्याचे आपल्याला दिसते.दक्षिण आशिया वांशिक दृष्ट्या वैविध्य असलेला समाज आहे. परंतु येथील वांशिक संघर्षामुळे येथील लोकशाही व्यवस्थेला अस्थिरता प्राप्त होते. लोकशाही व्यवस्था जर प्रभावीपणे राबवायची असेल तर स्थानिक समाजामध्ये शांतता प्रस्थापित होणे अतिशय महत्वाचे असते.समाजामध्ये जर शांतता व सौहार्द नसेल तर लोकशाही व्यवस्था प्रभावीपणे काम करू शकत नाही. दक्षिण आशिया मध्ये कमी अधिक प्रमाणात सर्वच देशांमध्ये वांशिक संघर्ष असल्याचे दिसते. वांशिक संघर्षामुळे सामजिक स्वास्थ नाहीसे होऊन राजकीय अराजकतेचे स्वरूप येऊ शकते. भारत, श्रीलंका, पाकिस्तान,नेपाळ,बाग्लादेश या देशामध्ये सातत्याने वांशिक संघर्ष होत असल्याचे आपल्याला दिसते.

**जमातवाद**

दक्षिण आशियामध्ये धार्मिक बहुलता आहे. विविध धर्माचे लोक येथे वास्तव्य करतात. प्रामुख्याने हिंदू,मुस्लीम,बौद्ध,ख्रिश्चन,जैन, ज्यू धर्माचे लोक दक्षिण आशिया मध्ये राहतात. दक्षिण आशिया च्या बहुसांस्कृतिक वारशामुळे सर्व धर्मियांचे सहअस्तीत्व स्वीकारले आहे.परंतु धार्मिक कट्टर ते मधून निर्माण होणारा जमातवादाचा प्रश्न लोकशाही समोरील मोठे आव्हान आहे . जमातवादामुळे समाजात द्वेषभावनेची पेरणी होती आणि सामजिक तेढ निर्माण होते. समाजामध्ये असणाऱ्या भिन्न धार्मिक विचारांचे पर्यावसन हिंसेमध्ये होते. धार्मिक तत्वांच्या आग्रहामुळे 'कायद्याचे राज्य' हि संकल्पना बाजूला राहते आणि धार्मिकतेच्या प्रभावात तेथील राजकारण आकाराला येते. जमातवादामुळे समता,बंधुता, न्याय या आधुनिक लोकशाही मुल्यांचे खच्चीकरण होऊन लोकशाहीला आव्हान निर्माण होते.

**सर्वसामावेशीकरणाचे आव्हान**

समाजातील शक्य तितक्या सर्व सामाजिक घटकांना सामावून घेणे हे लोकशाही व्यवस्थेची उद्देश आहे. परंतु समाजातील दक्षिण आशियाई देशातील सर्वच लोकशाही संस्थांमध्ये गरीब, स्त्रिया, वंचित जातीसामूह,

वांशिक गट, अल्पसंख्यांक समुदाय यांचे प्रतिनिधित्व अत्यल्प दिसते. या सर्व घटकांना लोकशाही प्रक्रियेत सहभागी करून घेणे हे अत्यंत महत्वाचे आहे. लोकशाही मध्ये समान प्रतीनिधीत्वाला अत्यंत महत्व आहे. न्याय्य प्रतिनिधित्व सर्वच सामाजिक घटकांना प्राप्त झाले नाही तर त्यांच्यामध्ये असंतोष निर्माण होऊन राजकीय अस्थिरता निर्माण होण्याचा धोका असतो. दक्षिण आशियाई लोकशाही समोर सर्वसामावेशीकरणाचेसर्व्सामेशिका महत्वाचे आव्हान असल्याचे आपल्याला दिसते.

**राजकीय अस्थिरता**

दक्षिण आशिया मधील सर्वच देशांमध्ये राजकीय अस्थिरता हे मोठे आव्हान असल्याचे दिसते. समाजातील सामाजिक -आर्थिक किंवा धार्मिक- वांशिक प्रश्नांमुळे असंतोष निर्माण होऊन राजकीय अस्थिरता तयार होते. दक्षिण आशियाई लोकशाही समोर सर्वात मोठे आव्हान राजकीय अस्थिरतेचे आहे. दक्षिण आशिया मधील पाकिस्तान, बांग्लादेश, श्रीलंका , नेपाळ, अफगाणिस्तान या देशामध्ये सातत्याने राजकीय अस्थिरता प्रस्थापित झाल्याचे दिसते. राजकीय अस्थिरतेमुळे लोकशाही व्यवस्था कमकुवत होते आणि त्याची विश्वासार्हता टाकत नाही.

**भ्रष्टाचार**

दक्षिण आशियाई देशांमध्ये भ्रष्टाचाराची अत्यंत गंभीर समस्या आहे . सार्वजनिक क्षेत्रात भ्रष्टाचाराच्या माध्यमातून संसाधने, संपत्ती मिळवणे व त्यातून सत्ता स्थानांची प्राप्ती करणे असे दुष्टचक्र दक्षिण आशियाई देशामध्ये पाहायला मिळते. भ्रष्टाचारामुळे निव्वळ आर्थिक नुकसान होत नाही तर संस्थात्मक नुकसान होते . लोकशाहीमध्ये लोकशाही संस्थांची अत्यंत महत्वाची भूमिका असते. भ्रष्टाचारामुळे या संस्थांची कार्यक्षमतेवर परिणाम होतो आणि त्यांची विश्वासार्हता राहत नाही. भ्रष्टाचारामुळे लोकशाही व्यवस्थेत समाजातील फक्त ठराविक अभिजन व श्रीमंत लोकांच्या हिताचे रक्षण केले जाते आणि सामान्य माणसाचे अधिकार दुर्लक्षिले जातात त्यामुळे लोकशाही व्यवस्थेवर याचे विपरीत परिणाम होतात.

**राजकारणाचे गुन्हेगारीकरण**

लोकशाही मध्ये लोकांचा राजकीय सहभाग अत्यंत महत्वाचा असतो. सामाजातील प्रत्येक सामान्य व्यक्तीला राजकीय प्रक्रियेमध्ये सहज सहभागी होता यायला हवे अशी लोकशाही व्यवस्थेची अपेक्षा असते.परंतु राजकारणामध्ये गुन्हेगारी पार्श्वभूमी असणारे लोक राजकीय सत्तास्थाने प्राप्त करत असतील तर लोकशाही व्यवस्थेची अपेक्षा फोल ठरते आणि लोकशाही मध्ये अपेक्षित लोकसहभाग व प्रतिनिधित्व प्राप्त होत नाही. दक्षिण आशियाई लोकशाही समोर येथील स्थानिक राजकारणाचे गुन्हेगारीकरण एक मोठे आव्हान आहे. दक्षिण आशियाई देशामढील स्थानिक राजकारणात लोकशाही संस्थांचा वापर करून गुन्हेगारी पार्श्वभूमी असणारे लोक बहुमताच्या तत्वाचा गैरवापर करून प्रवेश करून सत्ता स्थाने काबीज करताना दिसतात आणि त्यामुळे लोकशाहीत लोकांचा अपेक्षित सहभाग होत नाही.

**प्रसारमाध्यमांची स्वायत्तता**

लोकशाही व्यवस्थेत प्रसार माध्यमांची भूमिका अत्यंत महत्वाची असते . लोकशाही व्यवस्था प्रबळ करायची असेल तर प्रसार माध्यामानी प्रामाणिक भूमिका बजावणे आवशयक असते. प्रसार माध्यमे हे शासन आणि लोक यांच्यातील दुवा म्हणून कार्य करत असतात. शासन यंत्रणेवर नियंत्रण ठेवून त्यांच्या कार्याची चिकित्सा करणे हे अत्यंत महत्वाचे कार्य प्रसार माध्यमांकडून अपेक्षित असते.लोकशाही व्यवस्थेमध्ये प्रसार माध्यमे स्वायत्त व स्वतंत्र असणे अत्यंत गरजेचे असते.परंतु दक्षिण आशिया मधील प्रसार माध्यमांवर राजकीय दबाव निर्माण करून ठराविक राजकीय भूमिकेचा प्रचार -प्रसार करण्यास भाग पडले जात असल्याचे चित्र आहे. लोकशाही मध्ये प्रसार माध्यमे स्वतंत्र नसतील तर सामाजाचे वास्तव लोकांना

कळू शकणार नाही त्यामुळे प्रसार माध्यमांची स्वायत्तता अबाधित ठेवणे आणि त्यांचे स्वातंत्र टिकवणे हे एक ओठे आव्हान  दक्षिण आशियाई देशातील लोकशाहीसमोर आहे.

**समारोप:**

दक्षिण आशियाई देशातील लोकशाही व्यवस्थेचे  भविष्य या क्षेत्रात घडत  असलेल्या व्यापक सामाजिक व राजकीय परिवर्तनाच्या दिशांशी खोलवर जोडले गेले आहे. दक्षिण आशिया मध्ये घडत असणाऱ्या परिवर्तनात येथील लोकशाही व्यवस्था रुजविण्याचे,वाढविण्याचे सामर्थ्य आहे.दक्षिण आशिया मधील देशातील लोकशाही समोरील आव्हाने जरी गंभीर असली तरी येथील लोकशाही ला विस्तारण्यासाठी,बळकट करण्यासाठी बर्याच संधीही उपलब्ध आहेत.

**संदर्भसूची** :

1. Adeney, K., & Wyatt, A. (2004). "Democracy in South Asia: Getting beyond the Structure-Agency Dichotomy"*Political Studies.*

2. Maiorano, D. (2020, March 10). *The State of Democracy in South Asia*" ISAS.

3. Nepali Rohit Kumar, (2009), "Democracy in South Asia", International Institute for Democracy and Electoral Assistance.

4. यादव योगेंद्र,पळशीकर सुहास,डिसुझा पीटर,(२०१०) "लोकशाही जिंदाबाद – भारतीय उपखंडातील वैशिष्टेपूर्ण लोकशाहीचा शोध", अनु – सोनवणे मनोहर , समकालीन प्रकाशन पुणे.

5. खरात राजेंद्र, (जाने.२१,२०२२ )"दक्षिण आशियास लोकशाहीची आस",दै.सकाळ.